नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ९९ Issue - 99 | वार - बुधवार दि. २ सप्टेंबर २०२६ Blow- Wednesday Date 2 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## सुट्या खाद्यतेल व्यावसायिकांना कायद्यानुरूप बदलांसाठी एक वर्षाची मुदत

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; एफडीए आणि व्यापाऱ्यांची संयुक्त समिती स्थापन करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील सुट्या खाद्यतेल विक्रेत्यांना विद्यमान कायद्यानुसार व्यवसाय पद्धतीत आवश्यक बदल करण्यासाठी एक वर्षाचा संक्रमण कालावधी देण्यात येणार आहे. या बदलांसाठी उपाययोजना व मार्गदर्शन सुचविण्यासाठी अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आणि व्यापारी प्रतिनिधींची संयुक्त समिती स्थापन करण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार या बदलांना सामोरे जाताना व्यावसायिकांना राज्य शासनाकडून मदत, सुविधा तसेच अनुदान अथवा सबसिडी उपलब्ध करून देण्यात येईल, असा दिलासा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुट्या खाद्यतेल विक्रेत्यांनी दिला.

मंत्रालयात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सुट्टे खाद्यतेल व्यावसायिकांच्या बैठक झाली. बैठकीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अन्न व औषध प्रशासन तथा विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, अन्न व औषध प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे, अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे, महाराष्ट्र तौलिक महासंघाचे अध्यक्ष माजी खासदार रामदास तडस, माजी आमदार शिरीष चौधरी, खाद्यतेल उत्पादक व विक्रेता संघटनांचे कार्याध्यक्ष गजानन शेलार, महासचिव डॉ. भूषण कर्डिले, महाराष्ट्र प्रांतिक महासभेचे पोपटराव गवळी, शंकर ठक्कर, भारत कसळेकर आदी उपस्थित होते.


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सुट्या खाद्यतेल विक्रीवरील कारवाईची अंमलबजावणी तूर्तास एक वर्षासाठी स्थगित ठेवण्यात येईल. मात्र, त्यानंतर मुदतवाढ देता येणार नाही आणि कायद्याचे पालन करावेच लागेल. त्यामुळे या एक वर्षाच्या कालावधीत प्रत्येक व्यावसायिकांना आपल्या व्यवसाय पद्धतीत कायद्यानुरूप आवश्यक बदल करावे लागतील, या कालावधीत कायद्याचे पालन करण्यासाठी पारंपरिक व्यावसायिकांना कोणते बदल करावे लागतील, याबाबत समिती उपाय सुचवेल.

> **व्यवसाय संक्रमण अनुकूल करण्यासाठी शासन मदत करणार**

ग्रामीण भागातही सुट्या खाद्यतेलाची मागणी आणि गरज आहे. त्याचबरोबर या व्यवसायावर अनेक व्यावसायिकांचा रोजगार अवलंबून आहे. त्यामुळे कायदा आणि सामान्य माणसाची गरज यामध्ये योग्य मार्ग काढणे आवश्यक आहे. सुट्या खाद्यतेलाचा वापर आणि विक्रीची पद्धत राज्यात अनेक वर्षांपासून पारंपरिक स्वरूपात सुरू आहे. त्यामुळे ही पद्धत बदलण्यासाठी व्यावसायिकांना काही कालावधी देणे आवश्यक आहे. कायदा आपले काम करतो; मात्र पारंपरिक व्यवसाय पद्धतीतून कायद्यानुरूप व्यवस्थेकडे जाण्यासाठी संक्रमण कालावधी आवश्यक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या व्यवसायातील व्यावसायिक, खाद्यतेल विक्रेते, उत्पादक आणि पुर्नपॅकिंग करणारे उद्योजक यांच्यासाठी कायद्यानुरूप बदल करण्याचे नियोजन समितीच्या माध्यमातून करण्यात येईल. गुणवत्ता तपासणी व्यवस्था, पॅकेजिंग सुविधा आणि इतर आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी व्यावसायिकांना मदत करण्याचा शासनाचा प्रयत्न राहील, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

शासन कोणत्याही व्यावसायिकाला वंचित ठेवू इच्छित नाही. कायद्याचे पालन होतानाच व्यावसायिकांना उत्तम आणि सुरक्षित पद्धतीने व्यवसाय करता यावा, यासाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यावर भर दिला जाईल. बदल स्वीकारण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी शासन सहकार्य करेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. खाद्यतेलातील भेसळ



रोखण्याबरोबरच त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर होणारा परिणाम लक्षात घेऊन केंद्र शासनाने २०११ मध्ये यासंदर्भात कायदेशीर तरतुदी लागू केल्या आहेत. सुट्या खाद्यतेलाच्या विक्रीसंदर्भात कठोर नियमन करण्याचे निर्देश केंद्रीय सल्लागार समितीने दिले आहेत. या कायद्याच्या नियमनासाठी २८ ऑगस्ट २०२० पर्यंत चार वेळा अधिसूचना जारी करण्यात आल्या आहेत. राज्यात सध्या २,१०३ सुटे खाद्यतेल व्यावसायिक परवानाधारक आहेत. त्यापैकी ३७० व्यावसायिकांना पुनपॅकिंग करून खाद्यतेल विक्रीचे परवाने, तर ४८९ व्यावसायिकांना खाद्यतेल उत्पादनाचे परवाने देण्यात आले आहेत. बैठकीत उपस्थित लोकप्रतिनिधी तसेच सुट्या खाद्यतेल व्यावसायिक संघटनांच्या प्रतिनिधींनी आपल्या अडचणी व मागण्या मांडल्या. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी विभागाच्या कार्यवाहीबाबत सादरीकरण केले.

## नीट आंदोलकांवरील गुन्हे सर्वोच्च न्यायालयाकडून रद्द

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी आपल्या विशेष 'अनुच्छेद १४२' अंतर्गत अधिकारांचा वापर करत नीट २०२६ परीक्षेविरोधात २० ते २५ जुलैदरम्यान राज्यभर झालेल्या निदर्शनांप्रकरणी नोंदवण्यात आलेले सर्व एफआयआर रद्द केले आहेत. केंद्र सरकारने कॉकरोच जनता पार्टीच्या मागण्यांवर न्यायालयात आश्वासन दिल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

यानंतर कॉकरोच जनता पार्टीने ५ सप्टेंबर रोजी होणारे प्रस्तावित आंदोलन मागे घेतले आहे. दिल्ली पोलिसांसह महाराष्ट्र, आसाम, बिहार आणि पश्चिम बंगाल सरकारने या आंदोलनाशी संबंधित दाखल गुन्ह्यांबाबत सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल केले होते. यावर सुनावणी करताना न्यायालयाने हे निर्देश दिले.

> **सीजेपीचे ५ सप्टेंबरचे आंदोलन रद्द**

सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे निरीक्षण आणि निर्णय:

१) विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित: केवळ आंदोलनात सहभागी होणे हा गुन्हा मानला जाऊ शकत नाही, असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने आंदोलक विद्यार्थी व तरुणांच्या भवितव्याचा विचार करून हे सर्व गुन्हे रद्द केले आहेत.

२) अपवाद (२,८७३ व्यक्ती): दिल्ली पोलिसांनी सादर केलेल्या राष्ट्रीय डेटाबेसनुसार, ज्या २,८७३ व्यक्तींवर हिंसाचार, शारीरिक दुखापत करणे आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्याचे गंभीर गुन्हे दाखल आहेत, त्यांच्याविरोधात कायद्यानुसार कारवाई करण्यास आणि नवीन एफआयआर नोंदवण्यास न्यायालयाने परवानगी दिली आहे.

३) नवे गुन्हे नोंदवण्यास मनाई: २० ते २५ जुलैदरम्यानच्या आंदोलनात सहभागी झालेल्या इतर कोणत्याही विद्यार्थ्यांवर किंवा नागरिकांवर देशभरात कुठेही नवीन एफआयआर नोंदवला जाणार नाही, असे आश्वासन सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी केंद्राच्या वतीने न्यायालयात दिले.

आत्महत्याग्रस्त विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना आर्थिक मदत

नीट २०२६ परीक्षेशी संबंधित तणावातून आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना भरपाई देण्यासाठी एक राष्ट्रीय धोरण तयार केले जात असल्याचे केंद्र सरकारने न्यायालयाला सांगितले. धोरण निश्चित झाल्यानंतर पुढील तीन महिन्यांच्या आत बाधित कुटुंबांना आर्थिक भरपाई दिली जाईल, असे आश्वासनही सरकारने दिले.

## अर्थसंकल्पातील मंजूर निधी ओबीसी मंत्रालयाला तातडीने द्या



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ओबीसींसाठी अर्थसंकल्पातील मंजूर निधी वित्त विभागाने ओबीसी विभागाला तातडीने द्यावा, असे निर्देश ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना दिले. राज्यातील ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांना जागा उपलब्ध करून देणे, प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम अदा करणे आणि ३६ ओबीसी जातींचा केंद्राच्या यादीत समावेश करण्यासाह अन्य महत्त्वाच्या मुद्द्यांवर मंत्रालयातील परिषद सभागृहात मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली ओबीसी मंत्रीमंडळ उपसमितीची आढावा बैठक पार पडली. तेव्हा ते बोलत होते या बैठकीला अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, वन मंत्री गणेश नाईक, पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, जलसंधारण मंत्री संजय राठोड, इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ओबीसी महामंडळांच्या निधीचा प्रश्न येत्या डिसेंबरपर्यंत मार्गी लावण्याचे आणि काही विषय राज्य नियोजन समितीकडे पाठविण्याचे निर्देश यावेळी मंत्री बावनकुळे यांनी दिले. ते म्हणाले, ओबीसीमधील सर्व समाजाला न्याय देण्याची सरकारची भूमिका आहे. राज्यातील ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या योजना आणि महामंडळांच्या सक्षमीकरणासाठी शासन कटिबद्ध असून, कोणत्याही महामंडळाला किंवा योजनांना निधीची कमतरता शासन भासू देणार नाही.

महाज्योती आणि इतर महामंडळांच्या निधीबाबत निर्णय

> **ओबीसी मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश**

'महाज्योती'सह सर्व महामंडळांना प्रत्येकी ३०० कोटी रुपये देण्यात आले आहेत. मात्र, महाज्योतीने १ हजार कोटी रुपयांची मागणी केली आहे. निधीअभावी कोर्सेस बंद पडल्याची बाब समोर आल्यावर, ३०० कोटींचा निधी का कमी पडत आहे, याची कारणमीमांसा उपसमितीसमोर ठेवण्याचे आणि त्यानंतर तो प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर आणण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

प्रलंबित देयके तातडीने अदा करावी

१२५ कोटी रुपयांची प्रलंबित देयके तातडीने अर्थ विभागाकडे पाठविण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. 'महाज्योती'च्या पीएचडी फेलोशिपचे १२६ कोटी रुपयांचे प्रलंबित दायित्व असून, डिसेंबरपर्यंत हा सर्व निधी उपलब्ध करून देण्याचे निर्देश मंत्री श्री बावनकुळे यांनी दिले. वनार्टी संस्थेकडे सध्या ५० कोटींचा निधी असून ३०० कोटींची मागणी करण्यात आली आहे. हा प्रस्ताव राज्य नियोजन समितीकडे पाठविण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

शिक्षण, शिष्यवृत्ती आणि वसतिगृह सुविधा

ओबीसी विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिष्यवृत्तीची मर्यादा ७५ वरून २०० विद्यार्थ्यांपर्यंत वाढविण्याच्या मुद्यावर बैठकीत सकारात्मक चर्चा करण्यात आली. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा १ लाख रुपयांवरून थेट ८ लाख रुपयांपर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव राज्य नियोजन समितीकडे पाठविण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

उच्च शिक्षण आणि वसतिगृह

उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'पीपीपी' मॉडेल तयार करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. विद्यार्थ्यांची प्रलंबित शिष्यवृत्ती अदा करण्यासाठी ४,१३४ कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. मात्र, 'अगेन्स्ट कॅप' प्रवेशित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार नाही, हे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

रोजगार व स्पर्धा परीक्षा

प्रशासनात मराठी टक्का वाढावा यासाठी आयबीपीएस आणि आयआरबीमार्फत पावले उचलली जात असून, युपीएससी आणि एमपीएससी प्रशिक्षणार्थींच्या जागा वाढविण्याबाबत यावेळी सकारात्मक चर्चा करण्यात आली. निवासी आश्रमशाळांमध्ये सुविधा वाढविण्यासाठी गतवर्षीची ४८ कोटींची देयके प्रलंबित आहेत. यासाठी २०० कोटींची मागणी असून, ४०४२ कोटींचा नियतव्यय मंजूर झाला आहे. तसेच २४ आश्रमशाळांवर प्रशासक नेमण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

आत्महत्याग्रस्त कुटुंबांना दिलासा

नैराश्यातून आत्महत्या केलेल्या नागरिकांच्या कुटुंबांना मदत करणे आणि त्यांच्या वारसाला शासकीय नोकरी देण्याबाबत नावासहित प्रस्ताव मागविण्याच्या सूचनाही बैठकीत देण्यात आल्या. तसेच विभागाच्या प्रशासकीय कामकाजाकरिता प्रादेशिक कार्यालयांसाठी नवीन इलेक्ट्रिक वाहने खरेदी करण्यात येणार आहेत. इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयासाठी दोन माहिती तंत्रज्ञान सल्लागारांच्या सेवा उपलब्ध करून घेण्याबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली.

**धाराशिवमधून ६ आरोपींना ठोकल्या बेड्या**

**७०० ते ८०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून काढला आरोपीचा माग**

## समृद्धी महामार्गावरील १८ लाखांच्या दरोड्याचा ४८ तासांत पोलीसांनी लावला छडा!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

महाराष्ट्राची शान असलेल्या समृद्धी महामार्गावर वकिलाला लुटणाऱ्या टोळीचा नाशिक ग्रामीण पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत छडा लावला आहे. तब्बल १८ लाख रुपये रोख, सोन्याची अंगठी आणि मोबाईल लुटल्याप्रकरणी पोलिसांनी धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातून सहा आरोपींना अटक केली आहे.

सिन्नर तालुक्यातील मलधोन शिवारात समृद्धी महामार्गावर ही धक्कादायक घटना घडली होती. नाशिकमधील एका वकिलाची गाडी समृद्धी महामार्गावरून जात असताना आरोपींनी गाडीचा टायर पंक्चर केला. त्यानंतर सुमारे ११ ते १२ जणांच्या टोळक्याने गाडी अडवत वकिलाला लुटले. या दरोड्यात गाडीतील तब्बल १८ लाख रुपये रोख रक्कम, सोन्याची अंगठी आणि मोबाईल असा मुद्देमाल आरोपींनी लंपास केला आणि घटनास्थळावरून पसार झाले.

या घटनेची गंभीर दखल घेत नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली



आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांची चार विशेष पथके तयार करण्यात आली. पोलिसांनी या प्रकरणाचा कौशल्यपूर्ण तपास करत तब्बल ७०० ते ८०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. त्याचबरोबर महाराष्ट्रातील विविध ठिकाणची माहिती संकलित करून तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढण्यात आला. तपासादरम्यान आरोपी धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी सापळा रचत सहा जणांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेले आरोपी :- अर्जुन पवार- अशोक शिंदे- लखन काळे- धनाजी पवार- नितीन शिंदे- गोविंद पवार हे सर्व आरोपी कळंब, जिल्हा धाराशिव येथील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांनी आरोपींकडून लुटीतील काही मुद्देमाल हस्तगत केला आहे. मात्र या दरोड्यात सहभागी असलेले इतर आरोपी अद्याप फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. अटक केलेल्या आरोपींना नाशिकमध्ये आणण्यात आले असून, वावी पोलीस ठाण्याच्या पथकाकडून पुढील तपास सुरू आहे. ४८ तासांत ७०० ते ८०० उउढत कॅमेरे तपासत दरोड्याचा छडा लावल्याने नाशिक ग्रामीण पोलिसांच्या तपासाची जोरदार चर्चा होत आहे. समृद्धी महामार्गावरील या धाडसी दरोड्यामागे आणखी कोण कोण सहभागी आहेत? लुटीतील संपूर्ण रक्कम आणि मुद्देमाल पोलिसांच्या हाती लागणार का? याचा तपास पोलीस करत आहेत

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### मुख्यमंत्र्यांचा निर्णय

राज्यातील सुट्या खाद्यतेल विक्रेत्यांना विद्यमान कायद्यानुसार व्यवसाय पद्धतीत आवश्यक बदल करण्यासाठी एक वर्षाचा संक्रमण कालावधी देण्यात येणार आहे. या बदलांसाठी उपाययोजना व मार्गदर्शन सुचविण्यासाठी अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आणि व्यापारी प्रतिनिधींची संयुक्त समिती स्थापन करण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार या बदलांना सामोरे जाताना व्यावसायिकांना राज्य शासनाकडून मदत, सुविधा तसेच अनुदान अथवा सबसिडी उपलब्ध करून देण्यात येईल, असा दिलासा मुख्यमंत्र्यांनी नुकताच दिला आहे. मंत्रालयात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सुट्टे खाद्यतेल व्यावसायिकांच्या बैठक झाली. सुट्या खाद्यतेल विक्रीवरील कारवाईची अंमलबजावणी तूर्तास एक वर्षासाठी स्थगित ठेवण्यात येईल. मात्र, त्यानंतर मुदतवाढ देता येणार नाही आणि कायद्याचे पालन करावेच लागेल. त्यामुळे या एक वर्षाच्या कालावधीत प्रत्येक व्यावसायिकांना आपल्या व्यवसाय पद्धतीत कायद्यानुरूप आवश्यक बदल करावे लागतील, या कालावधीत कायद्याचे पालन करण्यासाठी पारंपरिक व्यावसायिकांना कोणते बदल करावे लागतील, याबाबत समिती उपाय सुचवेल. ग्रामीण भागातही सुट्या खाद्यतेलाची मागणी आणि गरज आहे. त्याचबरोबर या व्यवसायावर अनेक व्यावसायिकांचा रोजगार अवलंबून आहे. त्यामुळे कायदा आणि सामान्य माणसाची गरज यामध्ये योग्य मार्ग काढणे आवश्यक आहे. सुट्या खाद्यतेलाचा वापर आणि विक्रीची पद्धत राज्यात अनेक वर्षांपासून पारंपरिक स्वरूपात सुरू आहे. त्यामुळे ही पद्धत बदलण्यासाठी व्यावसायिकांना काही कालावधी देणे आवश्यक आहे.

# श्री म.नि.प्र. डॉ. शांतलिंगेश्वर महास्वामीजींचा भक्तिभावाने भव्य तुलाभार

## गुरुचरणी श्रद्धा, प्रेम आणि कृतज्ञतेचा भावपूर्ण आविष्कार; दूधनीतील श्री विरक्त मठ परिसर जयघोषाने दुमदुमला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दूधनी प्रतिनिधी : निंगप्पा निंबाळ

दूधनी येथील श्री विरक्त मठात श्री म.नि.प्र. डॉ. शांतलिंगेश्वर महास्वामीजींचा भव्य तुलाभार सोहळा रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी श्री गुरुशांतलिंगेश्वर शिवानुभव सेवा समिती आणि असंख्य भक्तांच्या उपस्थितीत भक्तिमय व भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. गुरुचरणी श्रद्धा, प्रेम, कृतज्ञता आणि समर्पण व्यक्त करण्याच्या भावनेतून भक्तांनी महास्वामीजींचा तुलाभार मोठ्या भक्तिभावाने केला.



तुलाभाराचा पवित्र क्षण उपस्थित भक्तांसाठी अत्यंत भावनिक आणि अविस्मरणीय ठरला. तुलाभाराच्या वेळी 'श्री गुरुशांतलिंगेश्वर महाराज की जय' आणि 'श्री म.नि.प्र. डॉ. शांतलिंगेश्वर महास्वामीजी की जय' अशा जयघोषांनी संपूर्ण मठ परिसर दुमदुमून गेला. गुरुचरणी अर्पण केलेला तुलाभार हा भक्तांच्या अंतःकरणातील श्रद्धा, प्रेम आणि गुरुभक्तीचा भावपूर्ण आविष्कार ठरला.

या पवित्र सोहळ्यात भक्तांच्या डोळ्यांत आनंदाश्रू, ओठांवर गुरुनाम आणि हृदयात गुरुकृपेची भावना असे भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळाले. अनेक भक्तांनी महास्वामीजींचे दर्शन घेऊन त्यांच्या चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेतला. गुरुचरणी अर्पण केलेल्या प्रत्येक वस्तूमागे भक्तांची नितांत श्रद्धा आणि समर्पणाची भावना दिसून आली. गुरु म्हणजे केवळ मार्गदर्शक नसून अंधारातून प्रकाशाकडे नेणारा दीपस्तंभ असतो, या भावनेतून करण्यात आलेला हा तुलाभार भक्तांच्या मनातील कृतज्ञतेला जणू शब्द देणारा ठरला. तुलाभाराच्या तराजूत वजन मोजता येते; मात्र भक्तीचे मोल कोणत्याही तराजूने मोजता येत नाही, ही अनुभूती या सोहळ्यात प्रकर्षाने जाणवली.

या प्रसंगी वे. शरणय्या शास्त्री-गुरू (चिणमगेरी) यांनी पौराणिक व आध्यात्मिक निरूपण केले. गवई भागण्णा अवरळळी यांच्या भक्तिगायनाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले, तर तबलावादक सिद्धण्णा माली पाटील यांनी सुरेल साथ दिली. भक्तिगीतांचे स्वर, आध्यात्मिक निरूपण आणि जयघोषांनी संपूर्ण मठ परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. श्री गुरुशांतलिंगेश्वर शिवानुभव महिला सेवा समिती, दूधनी, तसेच बळुर्गी व कवलगा परिसरातील भक्तगण आणि असंख्य माता-भगिनींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे सोहळ्याला विशेष भक्तिमय स्वरूप प्राप्त झाले. भक्तांच्या उत्साहामुळे संपूर्ण परिसरात जणू भक्तीचा महासागर लहरत असल्याचे चित्र दिसून आले. यावेळी सुभाष परमशेट्टी, परमेश्वर पाटील, सुगरिश बाहेरमठ, शिवा कण्णी, अनिल आळंद, रवी कल्लूर, मल्लू अचलेरी यांच्यासह अनेक मान्यवर, महिला समितीच्या पदाधिकारी आणि असंख्य भक्तगण उपस्थित होते. गुरुचरणी अर्पण केलेली श्रद्धा कधीही व्यर्थ जात नाही, या दृढ विश्वासाने भक्तांनी केलेला हा तुलाभार दूधनीच्या धार्मिक व आध्यात्मिक परंपरेतील एक अविस्मरणीय आणि भावस्पर्शी सोहळा ठरला. या सोहळ्याची भक्तिमय अनुभूती उपस्थितांच्या मनात दीर्घकाळ स्मरणात राहणार आहे.

# स्वेरीच्या वतीने 'पालवी'मध्ये 'रक्षाबंधन' संपन्न

## 'मेसा' व 'रासेयो' मधील विद्यार्थ्यांचा उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण नसून प्रेम, आपुलकी, संरक्षण, सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीची भावना जपणारा सण आहे. याच भावनेतून गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)च्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागाअंतर्गत असलेल्या 'मेसा' अर्थात मेकॅनिकल इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशन व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने कोर्टी रोड लगत असलेल्या 'पालवी' येथे 'रक्षाबंधना'चा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

सध्याच्या धावपळीच्या जीवनात समाजातील वंचित व गरजू लहान मुलांना प्रेम, आपुलकी आणि कुटुंबातील सदस्यांसारखा आधार मिळावा तसेच त्यांच्यासोबत संवाद साधून सामाजिक बांधिलकी जपावी, या उद्देशाने 'मेसा'च्या विद्यार्थ्यांनी हा उपक्रम राबविला. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी पालवीतील लहान मुलांशी संवाद साधून त्यांच्यासोबत आनंदाचे क्षण व्यतीत केले. विद्यार्थ्यांनी त्यांना राख्या बांधून बंधुभाव, प्रेम आणि संरक्षणाचा संदेश दिला. विद्यार्थ्यांच्या या अनोख्या उपक्रमामुळे उपस्थित लहान मुले आनंदित झाली. मुलांनीही विद्यार्थ्यांप्रती आपुलकी व प्रेमाची भावना व्यक्त केली.





रक्षाबंधनाच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी केवळ पारंपरिक पद्धतीने सण साजरा न करता, समाजातील लहान मुलांप्रती असलेली आपली जबाबदारीही अधोरेखित केली. 'रक्ताचे नातेच महत्त्वाचे नसते, तर माणुसकीचे नातेही तितकेच घट्ट असते.' हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार व मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. एस. एस. वांगीकर यांच्या नेतृत्वाखाली मेसा मधील विद्यार्थ्यांनी या सामाजिक उपक्रमाचे यशस्वीपणे आयोजन केले. याच उपक्रमांतर्गत मेसा व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने पालवी संस्थेस आर्थिक मदत तसेच आवश्यक १०० लेखन पॅड प्रदान करण्यात आले. या योगदानातून विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत पालवीतील लहान मुलांप्रती आपुलकी व मदतीचा हात पुढे केला.

नियोजन व आयोजन मेसाचे विद्यार्थी अध्यक्ष आदित्य डूबल व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विद्यार्थी समन्वयक प्रणव नवले यांच्या नेतृत्वाखाली इतर विद्यार्थी व स्वयंसेवक यांच्या सहकार्याने केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मेसाचे समन्वयक प्रा. कुलदीप पुकाळे यांनी विशेष प्रयत्न केले.

# शिपाई ते प्रशासकीय अधिकारी; प्रवाशांच्या हक्कांसाठी 'रेल्वे योद्धा'

# राजेश घनघाव यांचा सेवेतून समाजसेवेपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास





## उंबरमाळी-तानशेत स्थानकांसह ग्रामीण भागातील प्रश्नांसाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पद कोणतेही असो, कामाची निष्ठा आणि समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द असेल, तर सामान्य माणूसही असामान्य वाटचाल घडवू शकतो. या विचाराची प्रचिती देणारी कारकीर्द म्हणजे राजेश घनघाव यांचा प्रवास. ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील शिरोळ या छोट्याशा गावातून सुरू झालेली त्यांची वाटचाल १९९३ मध्ये शिपाई पदापासून सुरू झाली आणि मेहनत, प्रामाणिकपणा, अभ्यास व प्रशासकीय कौशल्याच्या जोरावर प्रशासकीय अधिकारी पदापर्यंत पोहोचली.

मात्र घनघाव यांची कहाणी केवळ पदोन्नतीची नाही. सरकारी सेवेत काम करत असतानाच सामान्य नागरिक, ग्रामीण भागातील रहिवासी आणि विशेषतः रेल्वे प्रवाशांच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठविणारा कार्यकर्ता म्हणूनही त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली. शासकीय सेवेतील अनुभवाचा उपयोग समाजहितासाठी करण्याची त्यांची भूमिका त्यांच्या कार्याला वेगळी उंची देते.

**शिक्षक वडिलांचे संस्कार; सेवाभावाची पायाभरणी**

शिरोळ हे राजेश घनघाव यांचे जन्मगाव. जिल्हा परिषद शाळेत शिक्षक असलेल्या त्यांच्या वडिलांनी मुलांना केवळ शिक्षणाचे महत्त्व सांगितले नाही, तर समाजाप्रती असलेली जबाबदारीही शिकवली.

समाजाने आपल्याला काही दिले आहे, त्यामुळे समाजासाठीही काहीतरी करायचे, हा विचार त्यांच्या मनात बालपणापासून रुजला. याच संस्कारांचा प्रभाव त्यांच्या पुढील आयुष्यावर दिसून आला.

नोकरीच्या जबाबदाऱ्या पार पाडतानाच सामान्य नागरिकांच्या अडचणी समजून घेणे, संबंधित विभागाकडे त्या मांडणे आणि प्रश्न सुटेपर्यंत त्याचा पाठपुरावा करणे, हीच पुढे त्यांच्या कामाची ओळख बनली.

**शिपाई पदापासून प्रशासकीय अधिकारीपदापर्यंत**

१९९३ मध्ये शिपाई म्हणून शासकीय सेवेत प्रवेश करताना भविष्यात प्रशासकीय अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळू, अशी कदाचित कल्पनाही नसेल. मात्र प्रत्येक टप्प्यावर नवीन जबाबदारी स्वीकारत, अनुभवातून शिकत आणि स्वतःमध्ये सातत्याने सुधारणा करत त्यांनी कारकीर्द घडवली.

तळागाळातील कर्मचाऱ्यापासून सुरुवात केल्यामुळे प्रशासनाची प्रत्यक्ष कार्यपद्धती त्यांना जवळून अनुभवता आली. कार्यालयीन प्रक्रिया, सामान्य नागरिकांच्या अडचणी, शासकीय यंत्रणेतील विविध स्तर आणि निर्णयप्रक्रिया यांचा अनुभव घेत त्यांनी प्रशासकीय अधिकारीपदापर्यंत मजल मारली.

यामुळेच नागरिकांची अडचण आणि प्रशासनाची कार्यपद्धती या दोन्ही बाजू समजून घेणारा अधिकारी अशी त्यांची प्रतिमा निर्माण झाली.

**कसारा-शहापूरच्या रेल्वे प्रवाशांसाठी बुलंद आवाज**

मुंबईची उपनगरीय रेल्वे ही लाखो प्रवाशांची जीवनवाहिनी आहे. मात्र कसारा, शहापूर, आसनगाव आणि परिसरातील प्रवाशांसाठी रेल्वे प्रवास आजही अनेक अडचणींनी भरलेला आहे.

लोकल फेऱ्या, वेळापत्रक, मेगाब्लॉक, स्थानकांवरील सुविधा, प्रवाशांची सुरक्षितता आणि ग्रामीण भागातील रेल्वे सुविधांचा अभाव अशा विविध प्रश्नांवर राजेश घनघाव यांनी रेल्वे प्रवासी संघटनेच्या माध्यमातून सातत्याने आवाज उठविला.

प्रवाशांच्या समस्या केवळ निवेदनापुरत्या मर्यादित न ठेवता त्या रेल्वे प्रशासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविणे आणि त्यावर निर्णय होईपर्यंत पाठपुरावा करणे, ही त्यांची कार्यपद्धती राहिली आहे.

प्रश्न उपस्थित करणे सोपे असते; मात्र प्रश्नाच्या मुळाशी जाऊन तो मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणे ही खरी कसोटी असते. घनघाव यांच्या कामात हीच जिद्द प्रकर्षाने दिसते.

**उंबरमाळी-तानशेतस्थानकांसाठी सातत्यपूर्ण लढा**

ग्रामीण आणि आदिवासी भागासाठी रेल्वे स्थानक म्हणजे केवळ प्रवासाचे साधन नाही. ते रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि शहरांशी जोडणारे महत्त्वाचे माध्यम आहे.

ही गरज लक्षात घेऊन उंबरमाळी आणि तानशेत रेल्वे स्थानकांच्या मागणीसाठी घनघाव यांनी सातत्याने पाठपुरावा केला. विद्यार्थी, नोकरदार, महिला आणि सर्वसामान्य प्रवाशांना रेल्वेची सुविधा अधिक जवळ उपलब्ध व्हावी, हा या मागणीमागील मुख्य उद्देश आहे.

स्थानिक नागरिकांच्या मागण्यांना संघटित स्वरूप देत त्या संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचविण्याच्या प्रक्रियेत त्यांची भूमिका महत्त्वाची राहिली.

**आरक्षण केंद्रांपासून लोहमार्ग पोलिस स्टेशनपर्यंत**

ग्रामीण भागातील प्रवाशांना रेल्वे आरक्षणासाठी दूरवर जावे लागू नये, यासाठी आसनगाव आणि कसारा येथे रेल्वे आरक्षण केंद्रे असावीत, या मागणीसाठीही त्यांनी पाठपुरावा केला.

त्याचबरोबर प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आसनगाव आणि अंबरनाथ येथे लोहमार्ग पोलिस स्टेशन असावे, अशी मागणीही त्यांनी पुढे रेटली.

ग्रामीण भागातील रेल्वे प्रवाशांना सुविधा देताना केवळ मोठ्या शहरांकडे लक्ष न देता छोट्या स्थानकांचाही विकास झाला पाहिजे, हा त्यांच्या भूमिकेचा केंद्रबिंदू राहिला आहे.

**जन्मगावासाठीही विकासाची तळमळ**

रेल्वे प्रवाशांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करत असताना आपल्या जन्मगावाच्या विकासाची नाळही त्यांनी कधी तुटू दिली नाही.

शिरोळ गावात प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यात यावे, यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. गावातील महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्यांना प्राथमिक उपचारांसाठी दूरवर जावे लागू नये, हा या मागणीमागचा उद्देश.

या विषयाला ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पुढे नेत विशेष ठराव करून घेण्याच्या प्रक्रियेतही त्यांचा सहभाग राहिला. त्यामुळे सामाजिक कामाची त्यांची व्याप्ती केवळ रेल्वेपुरती मर्यादित नसून गाव, ग्रामीण भाग आणि सामान्य नागरिकांच्या मूलभूत गरजांपर्यंत पोहोचलेली आहे.

**प्रशासनाचा अनुभव समाजहितासाठी**

राजेश घनघाव यांच्या कार्याची सर्वांत मोठी जमेची बाजू म्हणजे प्रशासकीय अनुभव आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम.

एखादा प्रश्न कोणत्या विभागाशी संबंधित आहे, तो कोणत्या स्तरावर मांडला पाहिजे, कोणत्या अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला पाहिजे आणि नागरिकांच्या मागणीला प्रशासकीय भाषेत प्रभावीपणे कसे मांडायचे, याचा त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे.

याच अनुभवाचा उपयोग त्यांनी सामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी केला. त्यामुळे त्यांचे सामाजिक काम केवळ भावनिक मागण्यांपुरते न राहता प्रशासकीय प्रक्रियेचा अभ्यास करून प्रश्न मार्गी लावण्याच्या प्रयत्नांवर आधारित राहिले.

**पद बदलले; पण सेवाभाव कायम राहिला!**

१९९३ मध्ये शिपाई म्हणून सुरू झालेला प्रवास प्रशासकीय अधिकारी पदापर्यंत पोहोचला. पद बदलले, जबाबदाऱ्या बदलल्या; मात्र सामान्य माणसासाठी काम करण्याची भूमिका बदलली नाही.

रेल्वे प्रवाशांचे प्रश्न, ग्रामीण भागातील रेल्वे सुविधा, उंबरमाळी-तानशेत स्थानकांची मागणी, आसनगाव-कसारा आरक्षण केंद्रांचा प्रश्न, लोहमार्ग पोलिस स्टेशनची मागणी आणि शिरोळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी केलेला पाठपुरावा-या विविध उपक्रमांतून त्यांच्या कार्याची व्याप्ती स्पष्ट होते.

**एक प्रवास... सेवेतून समाजसेवेचा!**

ग्रामीण भागातील एका सामान्य कुटुंबातून आलेल्या तरुणाने शिपाई पदापासून सुरुवात करून प्रशासकीय अधिकारीपदापर्यंत मजल मारणे, ही स्वतःमध्येच प्रेरणादायी बाब आहे. मात्र या प्रवासाला खरी अर्थपूर्णता मिळते ती त्यांनी आपल्या अनुभवाची दिशा समाजाकडे वळवली म्हणून.

वडिलांचे संस्कार, स्वतःची मेहनत, प्रशासकीय अनुभव आणि समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द या चार आधारस्तंभांवर राजेश घनघाव यांची वाटचाल उभी आहे.

नोकरी ही केवळ उपजीविकेचे साधन न मानता त्यातून मिळालेला अनुभव समाजाच्या उपयोगी आणणे, सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना आवाज देणे आणि ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांसाठी सातत्याने प्रयत्न करणे-हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख ठरते.

शिपाई ते प्रशासकीय अधिकारी हा त्यांच्या कारकिर्दीचा प्रवास आहे; पण प्रवाशांच्या हक्कांसाठी आणि सामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी उभे राहणे ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख आहे.

म्हणूनच राजेश घनघाव यांची वाटचाल एका पदोन्नतीची कहाणी न राहता सेवेतून समाजसेवेपर्यंतचा आणि प्रवाशांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या एका 'रेल्वे योद्ध्या'चा प्रेरणादायी प्रवास ठरते.

**शब्दांकन - डॉ. प्रफुल्ल शेवाळे, शहापूर**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पाणीपुरवठा सुरळीत होईपर्यंत अक्कलकोटकरांना टँकरचा दिलासा

## मिलन कल्याणशेट्टी यांच्या पुढाकाराने दररोज ७० ते ८० हजार लिटर पाण्याचा पुरवठा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था पूर्ववत होईपर्यंत नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या सुचनेनुसार नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्या पुढाकाराने अक्कलकोट शहरात दररोज टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे पाणीटंचाईच्या काळात शहरवासीयांना मोठा दिलासा मिळाला आहे.शहरातील बारा प्रभागांमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून होणाऱ्या मागणीनुसार विविध भागांत टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात आले आहे.



दररोज सुमारे १२ ते १३ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असून, प्रत्येक टँकरची क्षमता सुमारे सहा हजार लिटर आहे. त्यानुसार शहरवासीयांना दररोज अंदाजे ७० ते ८० हजार लिटर पाणी उपलब्ध करून दिले जात आहे.दरम्यान, अक्कलकोट शहराचा पाणीपुरवठा अधिक सुरळीत व विनाअडथळा करण्यासाठी कुरनूर धरणातील जलउपसा यंत्रणेसाठी वाढीव क्षमतेची पाइपलाइन टाकण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. तसेच जलशुद्धीकरण केंद्रातील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून वाढीव यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

सध्या सुरू असलेल्या या कामांमुळे नियमित पाणीपुरवठ्यात काही अडथळे निर्माण होऊन विलंब होत आहे. मात्र, या कालावधीत सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पाणीपुरवठा यंत्रणेची दुरुस्ती पूर्ण होऊन शहरा-



तील पुरवठा पूर्ववत होईपर्यंत ही व्यवस्था सुरू ठेवण्यात येणार असल्याचे नियोजन करण्यात आले आहे.अक्कलकोट शहरातील नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी संवेदनशीलता जपत नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्या प्रयत्नांतून पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे सर्वसामान्य शहरवासीयांना मोठा दिलासा मिळाला असून, त्यांचा त्रास कमी होण्यास मदत झाली व पाणी जपून वापरणे आवश्यक आहे.

# करकंब पोलीस ठाण्याची मोठी कारवाई.. सराफ दुकान फोडून चोरी करणारे दोन सराईत आरोपी अटकेत




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - दिनांक २०/ ८ /२०२६ रोजीच्या मध्यरात्री फिर्यादी फिर्यादी ओंकार संतोष महामुनी राहणार नवरे तालुका माळशिरस जिल्हा सोलापूर समर्थ ज्वेलरी उंबरे पागे, पंढरपूर येथील सोन्या चांदीच्या दुकानाचे कोणीतरी अज्ञात चोरट्याने शटल उत्कटून दुकानातील नऊ तोळे सोने व सव्वा किलो चांदीचे दागिने असा १६ लाख ३१ हजार ८७३ रुपये ची दागिने चोरून नेल्याबाबत करकंब पोलीस ठाणे, गु.र.न.२५५/२०२६ भारतीय न्याय संहिता क्रमांक ३०५,३३४,(४) ३(५) प्रमाणे अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

स्वतः पुण्याचे तपासाबाबत मा. अतुल कुलकर्णी सो. पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण, मा. विजय कबाडे अप्पर पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण, मा. पेरणा कट्टे सो. अप्पर पोलीस अधीक्षक पंढरपूर विभाग, प्रशांत डगळे सो. साहजिक पोलीस अधीक्षक पंढरपूर उपविभागीय पंढरपूर यांनी तपासाबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या होत्या त्याप्रमाणे करकंब पोलीस ठाण्याकडील तपास पथकाने तांत्रिक विश्लेषण व गोपनीय बातमीवरून आरोपी नामे १) बबलू रमेश चव्हाण वय २५ वर्ष मूळ राहणार निरगाव तालुका जत जिल्हा सांगली सध्या राहणार परिते तालुका माढा जिल्हा सोलापूर २) नवनाथ संभाजी कोळी वय ४० वर्ष राहणार परिते तालुका माढा जिल्हा सोलापूर यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे सखोल तपास केला असता त्यांनी सराफ दुकानातून चोरीस केलेले सर्व पावणे नऊ तोळे सोन्याचे व सव्वा किलो वजनाचे चांदीचे दागिने तसेच गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल असा एकूण १६,३१,७८२/रुपयांचा मुद्देमाल हा स्थगित करण्यात आला आहे.ए अटक करण्यात आलेले दोन्ही आरोपी सराईत गुन्हेगार असून आरोपी नामे १) बबलू रमेश चव्हाण, याच्यावर खून दरोडा आरोपी जबरी चोरी घरफोडी व२) नवनाथ संभाजी कोळी, चोरी , वाहन चोरी, अशा अनेक प्रकारचे गुन्हे यांच्यावर आहेत असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून नमूद आरोपींनी घोटी तालुका माढा येथे सराफ दुकान फोडून चोरी केल्याची तपासात निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी. सो. अप्पर पोलीस अधीक्षक मा विजय कबाडे सौ. अप्पर पोलीस अधीक्षक पंढरपूर विभाग मा. प्रेरणा कट्टे मॅडम, यांच्या सूचनेप्रमाणे मा. सह पोलीस अधीक्षक पंढरपूर उपविभाग पंढरपूर प्रशांत डगळे सो. यांच्या मार्गदर्शनाखाली करकम पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश लंगोटे, पोलीस उपनिरीक्षक निलेश पोमणे,पोस. विलास रणदिवे, सपोफौ. तांबोळी, सपोफो, लक्ष्मण भांगे, पोहको. ७७२ अशी पातार, ९९० अशोक भोसले, १४६८ हनुमंत सावंत, ७१५ श्याम गायकवाड, ६६० स्वप्नील बागल, २९९६ बालाजी कदम, १००१ अमोल माळी, १९४८ अमोल लोकरे, २५९ गिरी चापोन, ५९० प्रकाश नलावडे, ३९ महेश बोंगणे, डी ४८ निखिल काळे यांनी केली आहे.

# अनिलभाई निर्मळे आयोजित दहीहंडी सराव शिबिराला गोविंदा पथकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विक्रोळी,(केतन भोज) ;भाजपा ईशान्य मुंबई जिल्हा उपाध्यक्ष अनिलभाई निर्मळे यांच्या वतीने रविवारी विक्रोळी पार्कसाईट छत्रपती शिवाजी महाराज मैदान याठिकाणी दहीहंडी सराव शिबिर २०२६ चे आयोजन करण्यात आले होते.या सराव शिबिराला गोविंदा पथकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पहायला मिळाला.या दहीहंडी सराव शिबिराला मुंबईतील विविध पुरुष तसेच महिला गोविंदा पथकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.सहभाग घेणाऱ्या सर्व मंडळांना अनिलभाई निर्मळे यांच्या वतीने प्रोत्साहनपर बक्षिसे देऊन त्यांच्या उत्साहाला दाद देण्यात आली.या दहीहंडी सराव शिबिराच्या माध्यमातून एकजूट,शिस्त आणि महाराष्ट्राची पारंपरिक संस्कृती जपण्याचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.सामाजिक उपक्रम आणि युवा शक्तीला दिशा अनिलभाई निर्मळे यांनी नेहमीच विक्रोळी पार्कसाईट परिसरात सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य आणि क्रीडा क्षेत्राशी संबंधित विविध उपक्रम राबवण्यात पुढाकार घेतला आहे.परिसरातील युवक आणि नागरिकांना एकत्र आणण्याचे कार्य ते सतत करत असतात.या दहीहंडी सराव शिबिराच्या निमित्ताने परिसरातील मंडळांना एकत्र आणून युवा शक्तीला सकारात्मक दिशा देण्याचा आणि नव्या पिढीची नाळ पारंपरिक संस्कृतीशी जोडण्याचा प्रयत्न यानिमित्ताने करण्यात आला. या दहीहंडी सराव शिबिराला मुंबईच्या महापौर रितू तावडे,वर्षा राम कदम तसेच युवा मोर्चा मुंबई अध्यक्ष दीपक सिंह यांनी उपस्थित राहून गोविंदा पथकांचा उत्साह वाढविला.या दहीहंडी शिबिरात मुंबईतील शंभरहून अधिक गोविंदा पथकांनी सहभाग घेतला.गोविंदांनी सरावादरम्यान पाच सहा आणि सात थरांचे मनोरे रचत दमदार सलामी दिली.थरांची उंची वाढत असताना नागरिकांनी टाळ्यांचा कडकडाट करीत गोविंदांचा उत्साह वाढविला. हे दहीहंडी सराव शिबिर उत्साह पार पडण्यासाठी भाजपा पार्कसाईट मंडळातील भाजपच्या सर्वच स्थानिक पदाधिकारी कार्यकर्ते यांनी कठोर परिश्रम घेतले.



# नळदुर्ग बसस्थानकात फिरून खारे शेंगदाणे गोळ्या बिस्कीट विक्रेत्याचा प्रामाणिकपणा : प्रवाशी यांनी विसरून गेलेला अँड्रॉइड मोबाईल वाहतूक नियंत्रणकाकडे केला जमा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी(एस.के.गायकवाड) : दि.३१ऑगस्ट २०२६ रोजी रुकाळी ११.३० वा. दरम्यान तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग बस स्थानकात बाकड्यावर विसरून गेलेला एका प्रवासाचा अँड्रॉइड मोबाईल बस स्थानक परिसरात फिरून खारे शेंगदाणे गोळ्या बिस्कीट विकणाऱ्या विक्रेत्याने प्रामाणिकपणे वाहतूक नियंत्रकाकडे जमा करून संबंधित मोबाईल परत केला त्यांच्या या प्रामाणिक पणाबद्दल प्रवासी वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे.

या बाबत सविस्तर वृत्त असे की प्रत्येक बस स्थानक, रेल्वे स्टेशन संबंधित स्पीकर वरून अवाहन केले जाते की प्रवाशांनी आपले किंमती दागिने मोबाईल जपून ठेवा, चोरापासून सावध रहा अशी सांगण्याची वेळ का आली तर गर्दींचा फायदा घेऊन वारंवार गळ्यातील दागिने अँड्रॉइड मोबाईल वगैरे चोरीचे प्रकार हल्ली वाढलेले आहेत त्यामुळे असे आव्हान करावे लागते. परंतु आजही काही प्रामाणिक माणसे आहेत त्यामुळे कुठेतरी माणुसकी जिवंत आहे असे वाटते याचाच प्रत्यय तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग बस स्थानकात आला.एका प्रवाशाने नळदुर्ग येथील बस स्थानकात बाकड्यावर अंदाजे १० ते १५००० हजार किंमतीचा अँड्रॉइड मोबाईल विसरून गेला होता. तो मोबाईल नळदुर्ग बस स्थानक परिसरात फिरून खारे शेंगदाणे गोळ्या बिस्कीट विकणारे खंडूशा बताले यांच्या निदर्शनास आला.त्यांनी तो मोबाईल घेऊन त्याच बाकड्यावर व समोरच्या बाकड्यावरील काही लोकांना विचारले की हा मोबाईल तुमचा तर नाही ना काही महाविद्यालय विद्यार्थी तिथे होते त्यांनी सगळ्यांनी सांगितलं की हा मोबाईल आमचा नाही.तेंव्हा त्यांनी तो मोबाईल त्या दिवशी सेवेत कार्यरत असलेले नळदुर्ग बस स्थानकाचे वाहतूक नियंत्रक महेश डुकरे यांच्याकडे जमा केला.काही वेळाने लगेचच त्याच मोबाईलवर सलगरा (दिवटी) ता. तुळजापूर येथील श्रीमंत गायकवाड यांचा फोन आला फोनची रिंग वाजत होती वाहतूक नियंत्रकानी यांनी तो फोन उचलला तेंव्हा त्यांना सांगण्यात आले की सदर माझा मोबाईल मी बसस्थानकामध्ये विसरलो आहे.आणि मी तो मोबाईल घेण्यासाठी येतोय आपण कोठे अहात तेंव्हा त्यानी त्यांना व खंडूशा बताले याना बसस्थानकात बोलावून घेतले.वाहतूक नियंत्रक यांनी ओळख पटवून त्यांना तो मोबाईल परत दिला.त्यावेळी त्याच्या चेहऱ्यावर आनंददायी भाव दिसून आला.त्यांनी खंडूशा बताले व वहातुक महेश डूकरे यांचे आभार व्यक्त केले.सदर प्रकरणी प्रवासी वर्गातून समाधान व्यक्त केले जात असून खंडूशा बताले यांच्या प्रामाणिक पणाबदल त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले. यावेळी पोलीस कॉन्स्टेबल कुंभार साहेब,रिपाइं (आठवले) चे जिल्हा सचिव एस. के. गायकवाड, जेष्ठ कार्यकर्ते उत्तम झेंडारे,युवा कार्यकर्ते विशाल डुकरे सह प्रवासी उपस्थित होते.

**कल्याणशेट्टी शिक्षण संकुलातील शिक्षण परिषदेत प्रतिपादन**

# आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून विद्यार्थ्यांना मूल्याधिष्ठित शिक्षण द्यावे : सोमेश्वर स्वामी




### शिक्षण प्रक्रियेतील नवीन अभ्यासक्रम स्वीकारावे

**शिक्षण पद्धतीमध्ये अमुलाग्र बदल होत आहेत नवीन अभ्यासक्रम देखील कार्यान्वित झाले आहे, त्याचा शिक्षकांनी स्वीकार केला पाहिजे, त्या दृष्टीने शैक्षणिक वाटचाल सुद्धा केली पाहिजे असे यावेळी संसाधन व्यक्ती म्हणून राजेंद्र म्हेहोळकर यांनी सांगितले.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : शिक्षकांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून विद्यार्थ्यांना मूल्याधिष्ठित शिक्षण दिल्यास शिक्षणातील गुणवत्ता वाढणार आहे, नवीन शैक्षणिक धोरण, विचार व कल्पना देखील समोर येणार आहेत, याच उद्देशाने दरमहा शिक्षण परिषद घेत असल्याचे प्रतिपादन अक्कलकोट नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी सोमेश्वर स्वामी यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित गिरजामाता प्राथमिक मराठी विद्यालय व अक्कलकोट नगरपरिषद शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या शिक्षण परिषदेच्या शुभारंभ कार्यक्रमात ते बोलत होते.

व्यासपीठावर केंद्र समन्वयक गौरीशंकर कोळी, गणेश आंबुरे, गिरीजामाता विद्यालयाचे मुख्याध्यापक सुरेश आवटे, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरण, डिजिटल शिक्षण, कौशल्याधारित शिक्षण आणि संशोधन यांसारख्या विषयांवर विचारमंथन करण्यासाठी शिक्षण परिषदेचा उपयोग होत आहे. शिक्षण क्षेत्रातील सकारात्मक बदलांना चालना देणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची निर्मिती करणे हे शिक्षण परिषदेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. म्हणून शिक्षकांनी कार्यशाळेतील तज्ञ व्यक्तींचे विचार आत्मसात केले पाहिजे.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून शिक्षण परिषदेचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेश हंचाटे यांनी केले सूत्रसंचालन प्रतिभा माने यांनी केले तर आभार मुख्याध्यापक सुरेश आवटे यांनी मानले. यशस्वीतेसाठी गिरीजामाता प्राथमिक मराठी विद्यालयाचे शिक्षक लक्ष्मण हरजे, जयप्रकाश गुरव यांनी प्रयत्न केले.

# प्रलंबित महसुली प्रकरणांच्या तडजोडीसाठी 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून आणि समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत न्याय व हक्क पोहोचविणे या त्यांच्या विचारांच्या मूळ सूत्राच्या अनुषंगाने महसूल विभागांतर्गत प्रलंबित अर्धन्यायिक प्रकरणे परस्पर सहमतीने आणि तडजोडीने निकाली काढण्यासाठी पंढरपूर उपविभागात 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान' राबविण्यात येत असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

या अभियानात मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, अपर जिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या सर्व प्रकारच्या महसुली दाव्यांचा आणि अपिलांचा समावेश असेल.

रपूर उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या पंढरपूर तालुक्यात १ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर या कालावधीत प्रसिध्दी व जनजागृती मोहिम, प्रकरणांचे वर्गीकरण तसेच सहमतीने पहिल्या टप्प्यातील दाव्यांचा कायम स्वरुपी निपटारा करण्यात येणार आहे. १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत प्रलंबीत अपिलांचा आढावा घेवून पक्षकारांच्या सहमतीने व तडजोडीने तहसील व उपविभागीय स्तरावरील गुंतागुंतीच्या महसुली दाव्यांमध्ये तडजोड करण्यात येणार आहे. तर ०१ फेब्रुवारी ते १० मार्च कालावधीत उर्वरित सर्व शक्य दाव्यांच्या अंतिम निपटारा करण्यात येणार आहे. दि. १७ आक्टेंबर २०२६ व ९ जानेवारी २०२७ तर २० मार्च २०२७ रोजी प्रत्यक्ष लोकअदालतीत उपविभागीय अधिकारी स्तरावरील केसेस उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसिल स्तरावरील केसेस तहसिलदार कार्यालयात होणार आहेत. तसेच मोहोळ तालुक्यात पहिल्या टप्प्यातील प्रत्यक्ष लोकआदलत १६ सप्टेंबर २०२६ रोजी होणार आहे.

विभागांतर्गत अर्धन्यायिक प्रकरणे प्रलंबित असलेल्यांनी या लोक अदालतीचा लाभ घेऊन तडजोडीने प्रकरण निकाली काढण्यासाठी संबंधिताकडे अर्ज करावेत, असे आवाहन उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

# पत्रकारांच्या एकजुटीचा नवा अध्याय!

## अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदी शिवराज काटकर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क.

सांगली / प्रतिनिधी सुधाकर रणदिवे

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार, संपादक व सिद्धहस्त लेखक शिवराज काटकर यांची निवड झाली असून, सांगली येथे झालेल्या भव्य-दिव्य सोहळ्यात त्यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. महाराष्ट्रासह देशभरातील पत्रकारांचे लक्ष वेधून घेणाऱ्या या सोहळ्याला ६०० पेक्षा अधिक पत्रकारांची उपस्थिती होती.

पत्रकारांच्या हक्कांसाठी सातत्याने लढणाऱ्या आणि पत्रकारिता क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या शिवराज काटकर यांच्यावर आता परिषदेची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सांगली जिल्ह्याला प्रथमच अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्षपद मिळाल्याने जिल्ह्यातील पत्रकारांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

**दिग्गज पत्रकारांच्या परंपरेचा वारसा**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद ही पत्रकारांच्या संघटनात्मक शक्तीचे प्रतिनिधित्व करणारी देशातील अग्रगण्य पत्रकार संघटना आहे. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांतील ३५४ तालुक्यांमध्ये परिषदेच्या शाखा कार्यरत असून, महाराष्ट्राबाहेरही दिल्ली, पणजी, बेळगाव, विजापूर, इंदूर, हैदराबाद आदी ठिकाणी परिषदेचे कार्य विस्तारले आहे. देशभरातील सुमारे ११ हजार पत्रकार परिषदेशी जोडले गेले आहेत.

आचार्य अत्रे, पा. वा. गाडगीळ, अनंत भालेराव यांसारख्या दिग्गज पत्रकारांनी ज्या संस्थेचे अध्यक्षपद भूषविले, त्या गौरवशाली परंपरेत आता शिवराज काटकर यांच्या नावाची भर पडली आहे.

**पत्रकारांच्या प्रत्येक लढ्यात सक्रिय सहभाग**

शिवराज काटकर हे बेळगाव तरुण भारतच्या सांगली आवृत्तीचे संपादक आहेत. पत्रकारिता आणि सामाजिक चळवळीशी त्यांचे घट्ट नाते असून, पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी झालेल्या आंदोलनांमध्ये त्यांनी सातत्याने सक्रिय सहभाग घेतला आहे.

### श्री.एस.एम.देशमुख यांच्या हस्ते काटकर यांचा सत्कार; देशमुख-काटकर यांची उघड्या जीपमधून सांगलीत भव्य मिरवणूक

हाडाचे पत्रकार आणि सिद्धहस्त लेखक म्हणून परिचित असलेल्या काटकर यांनी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून सांगली जिल्ह्यात पत्रकारांसाठी प्रशिक्षण शिबिरे, मार्गदर्शनपर उपक्रम आणि विविध संघटनात्मक कार्यक्रम राबविले आहेत. विशेष म्हणजे त्यांच्या वडिलांचाही परिषदेच्या कार्याशी जवळचा संबंध होता. त्यामुळे पत्रकार संघटनेच्या कार्याचा हा वारसा आता शिवराज काटकर यांच्या माध्यमातून पुढे जाणार आहे.

**श्री.एस.एम.देशमुख यांच्या हस्ते सत्कार**

अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री. एस. एम. देशमुख यांच्या हस्ते शिवराज काटकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी काटकर यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला मावळते अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त शरद पाबळे, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, डिजिटल मीडिया परिषदेचे प्रमुख अनिल वाघमारे, मुंबई प्रेस क्लबचे अध्यक्ष सुरेंद्र गांगण, कार्यवाह पांडुरंग म्हस्के यांच्यासह राज्यभरातील पदाधिकारी व ६०० पेक्षा अधिक पत्रकार उपस्थित होते.

### मुंबई प्रेस क्लबच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा गौरव

**यावेळी मुंबई प्रेस क्लबच्या नवनिर्वाचित सर्व पदाधिकाऱ्यांचा एस. एम. देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच उदगीर अधिवेशन यशस्वी केल्याबद्दल सचिन शिवशेट्टे आणि त्यांच्या टीमचाही विशेष गौरव करण्यात आला.**

**उघड्या जीपमधून सांगली शहरात जल्लोष**

अध्यक्षपदी शिवराज काटकर यांची निवड झाल्यानंतर सांगली शहरातून त्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. एस. एम. देशमुख आणि शिवराज काटकर उघड्या जीपमधून मिरवणुकीत सहभागी झाले. यावेळी पत्रकार, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवत नवनिर्वाचित अध्यक्षांचे अभिनंदन केले.

पत्रकारांच्या हक्कांसाठी संघर्ष, पत्रकारितेची विश्वासार्हता जपणे, नवोदित पत्रकारांना प्रशिक्षण देणे आणि राज्यातील पत्रकारांची संघटनात्मक ताकद अधिक भक्कम करणे, या दृष्टीने शिवराज काटकर यांच्या नेतृत्वाकडे पत्रकारांचे लक्ष लागले आहे.

---

# पंढरीतील स्विमिंग टँकला मौत का कुवा बनवणाऱ्या गलथान कारभाराविरोधात उपोषण, दोषींवर कारवाई करण्याची मुख्याधिकाऱ्यांचे लेखी आश्वासन



पंढरपूर : क्षार तरुणांचा बळी घेणारा पंढरीतील स्विमिंग टँक च्या गलथान कारभारावर सोलापूर जिल्हा ओबीसी काँग्रेसचे माजी अध्यक्ष समीर कोळी, यांच्या नेतृत्वाखाली लाक्षणिक उपोषण केले असता. त्या चौकशीनंतर दोषीवर कारवाई करण्याचे, पंढरपूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्या लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

पंढरीतील पद्मावती उद्यानामधील एक स्विमिंग टँक असून त्या स्विमिंग टँक मध्ये आतापर्यंत चार तरुणांचे बळी गेले आहेत २०२४ मध्ये याच ठेकेदाराच्या कार्यकाळात पहिला बळी गेला असता त्यासंबंधी काम व चौकशी झाली काय? टँक चालवण्यास कसा काय दिला गेला अशा या गलथान कारभारच्या विरोधात सोलापूर जिल्हा काँग्रेस सेलच्या वतीने दिनांक १ ९ २०२६ रोजी पंढरपूर नगरपरिषदेच्या मुख्य प्रवेशद्वारावर काँग्रेसच्या कार्यकर्त्यांच्या वतीने लाक्षणिक उपोषण केले असता पंढरपूर नगरपालिकेने याची दखल घेत पंढरपूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे आणि उपोषण स्थळी भेट देत उपोषण कार्यकर्त्यांची चर्चा केली व संबंधित प्रकरणाचा व्यापार आहे दाखल करून त्याचा क्रमांक झिरो फाईव्ह झिरो असा आहे हा एक एफआरआय दिनांक २९ ८ २०२२ अन्वय दाखल केला असून संबंधितावर योग्य ती कारवाई केली जाईल ठेकेदारास ब्लॅकलिस्ट करण्यात येईल असेही त्यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले आहे. योग्य ती कारवाई न झाल्यास गणेश विसर्जन झाल्यास परत उपोषण करण्यात येईल असेही त्यांनी कार्यकर्त्यांनी सांगितले आहे.

यावेळी वरिष्ठ उपाध्यक्ष हनुमंत मोरे जिल्हा उपाध्यक्ष नागेश गंगेकर उपाध्यक्ष सुहास बाळवणकर जिल्हा सचिव प्राध्यापक अशोक डोळ सर ओबीसी अध्यक्ष मिलिंद आडवळकर युवक अध्यक्ष संदीप शिंदे समाजसेवक शिवाजीराजे धोत्रे सोशल मीडिया तालुका अध्यक्ष देवानंद इरकल, सोशल मीडिया अध्यक्ष अदटराव, माजी तालुकाध्यक्ष बाळासाहेब आजबे, साहेब वाघमारे, व सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# निफाड नागरी पतसंस्थेला १.०७ कोटींचा निव्वळ नफा; सभासदांना १० टक्के लाभांश




निफाड/प्रतिनिधी : स्व. शांतीलालजी सोनी निफाड नागरी सहकारी पतसंस्थेची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा निफाड येथील शिवनेरी लॉन्स येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. संस्थेने आर्थिक वर्षात तब्बल १ कोटी ७ लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळवला असून, सभासदांना १० टक्के लाभांश देण्याची घोषणा करण्यात आली आहे.

संस्थेचे चेअरमन तथा सभेचे अध्यक्ष अशोक फकिरचंद पोफळीया यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा झाली. संस्थेला लेखापरीक्षणात 'अ' वर्ग प्राप्त झाल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

सभेपूर्वी सकाळी ९ वाजता सभासदांसाठी सहकार विकास अधिकारी पी. एम. धनगर यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. त्यानंतर संस्थेचे आद्य प्रवर्तक स्वर्गीय शांतीलालजी सोनी यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करून सभेला सुरुवात झाली. संस्थेचे अधिकारी शाम प्रभाकर भंडारे यांनी श्रद्धांजलीचे वाचन केले.

अध्यक्षीय मनोगतात अशोक पोफळीया यांनी संस्थेच्या मागील आर्थिक वर्षातील कामकाजाचा आणि आर्थिक प्रगतीचा आढावा मांडला. १ कोटी ७ लाखांचा निव्वळ नफा आणि 'अ' वर्ग लेखापरीक्षण ही संस्थेच्या प्रगतीची महत्त्वाची पावले असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत दै. देशदूत वृत्तसमूहाकडून 'सहकार दीपस्तंभ' पुरस्कार मिळाल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

दरम्यान, सभासदांनी संस्थेच्या आर्थिक प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करत विविध विधायक सूचना मांडल्या. नंदकिशोर कापसे, विनायक शिंदे, स्वप्निल बिनायकिया, उत्तमराव निरभवणे, महेश चोरडीया, मधुकर शेलार, विजय धारराव, संजय गाजरे, अशोक कराड, सचिन गिते, शंकर कडलग यांच्यासह अनेक सभासदांनी चर्चेत सहभाग घेतला.

यावेळी व्हाईस चेअरमन मिनाताई सुरेश कुंदे, संचालक मंडळातील सदस्य, संस्थेचे अधिकारी आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेच्या शेवटी संचालक प्रतिक नंदलाल बाफणा यांनी उपस्थितांचे आभार मानले. राष्ट्रगीताने सभेची सांगता करण्यात आली

एकंदरीत, १ कोटी ७ लाखांचा निव्वळ नफा, 'अ' वर्ग लेखापरीक्षण आणि सभासदांना १० टक्के लाभांश - या कामगिरीमुळे स्व. शांतीलालजी सोनी निफाड नागरी सहकारी पतसंस्थेची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा विशेष ठरली.

---

# एमआयटी विश्वशांती गुरुकुलमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा






पंढरपूर : हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनानिमित्त साजरा करण्यात येणारा राष्ट्रीय क्रीडा दिवस वाखरी, पंढरपूर येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये विविध क्रीडा स्पर्धा आणि उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे निवृत्त क्रिडा शिक्षक भालचंद्र देवधर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी विविध गटांमध्ये क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विश्वशांती गुरुकुलमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने या स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवत खेळाडूवृत्तीचे दर्शन घडविले.

प्रमुख पाहुणे भालचंद्र देवधर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, क्रिडा क्षेत्राकडे केवळ मनोरंजनाचा एक भाग म्हणून न पाहता, त्यामध्ये उज्ज्वल करिअर घडविण्याच्या संधी शोधणे ही आजच्या काळाची गरज आहे. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच शिस्त, आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि सांघिक भावना विकसित होतात, असेही त्यांनी नमूद केले.

मुख्याध्यापक शिवाजी गवळी यांनी एमआयटी विश्वशांती गुरुकुलमध्ये उपलब्ध असलेल्या विविध क्रीडा सुविधांची आणि जिल्हा तसेच विभागीय स्तरावर विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कामगिरीची माहिती दिली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे क्रिडा शिक्षक मनीष संपांगे, ऋषिकेश गावडे, पल्लवी पाटील आणि वैभव चौधरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

**आयुक्त मनिषा आव्हाळे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक**

**विसर्जन, स्वच्छता, सुरक्षा व वाहतूक व्यवस्थेचे नियोजन**

# गणेशोत्सवासाठी उल्हासनगर महापालिका प्रशासन सज्ज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/बाळासाहेब अहिरे

उल्हासनगर, दि. १ सप्टेंबर २०२६ : आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनाची संयुक्त आढावा बैठक आयुक्त मनिषा आव्हाळे, भा.प्र.से. यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका मुख्यालयातील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. यंदाचा गणेशोत्सव १४ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत होणार असून, उत्सव शांततामय, सुरक्षित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक वातावरणात पार पाडण्यासाठी विविध विभागांना आवश्यक निर्देश देण्यात आले.

'विसर्जन आपल्या दारी' उपक्रमांतर्गत फिरते गणेशमूर्ती विसर्जन वाहन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच विविध सोसायट्यांमध्ये कृत्रिम विसर्जनाची सुविधा उपलब्ध करण्याच्या सूचना देण्यात आल्या. गणेश विसर्जन घाट व कृत्रिम विसर्जन तलावांची दुरुस्ती, विसर्जनस्थळी ये-जा करण्यासाठी स्वतंत्र मार्ग आणि सर्व विसर्जनस्थळी सीसीटीव्ही व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील रस्ते व खड्ड्यांची पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करण्यासह वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले. गणेश मंडळांना मंडपाची परवानगी देताना रस्त्यावर अडथळा निर्माण होणार नाही, तसेच बॅनर-पोस्टरमुळे शहराचे विद्रुपीकरण होणार नाही, याची काळजी घेण्यास सांगण्यात आले.



पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी पर्यावरणपूरक मूर्ती व सजावटीचा वापर करण्याबाबत गणेश मंडळांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. उत्कृष्ट पर्यावरणपूरक देखावा सादर करणाऱ्या मंडळांना पारितोषिक देण्याबाबतही नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. निर्माल्य संकलन व योग्य विल्हेवाटीबाबतही आवश्यक व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले.

गणेशोत्सव काळात वीजपुरवठा सुरळीत राहण्यासाठी विद्युत विभागाने आवश्यक उपाययोजना कराव्यात. उंच गणेशमूर्तींना विद्युत वाहिन्यांचा अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घेण्याचेही निर्देश देण्यात आले. सार्वजनिक आरोग्य विभागाने स्वच्छता, कचरा संकलन आणि विसर्जनस्थळांची साफसफाई याकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

७ फुटांपेक्षा अधिक उंचीच्या गणेशमूर्तींचे कल्याण खाडी येथे विसर्जन होणार असल्याने संबंधित गणेश मंडळांनी उल्हासनगर व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेशी समन्वय साधून निर्धारित वेळेत व नियमांचे पालन करून विसर्जन करावे, असे आवाहन करण्यात आले.

विसर्जनस्थळी वैद्यकीय पथक, अग्निशमन यंत्रणा व सुरक्षा व्यवस्था सज्ज ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच पोलीस व वाहतूक विभागाने कायदा-सुव्यवस्था आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. शासनाच्या निर्देशानुसार गणेशोत्सव 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्यासाठी महापालिकेच्या संबंधित विभागांनी सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन करावे, अशाही सूचना देण्यात आल्या.

बैठकीस महापालिकेचे उपायुक्त, शहर अभियंता, कार्यकारी अभियंते, सहायक आयुक्त, पोलीस अधिकारी, वाहतूक शाखेचे अधिकारी, महावितरणचे अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

गणेशोत्सव शांततामय, सुरक्षित, स्वच्छ व पर्यावरणपूरक वातावरणात पार पाडण्यासाठी महापालिका प्रशासन सज्ज असून, नागरिक व गणेश मंडळांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.